

# 5 किती?




## आजोबांबरोबर फेरफटका !







मुलांना चित्र पाहू द्या आणि बागेत ती काय करताहेत त्याबद्दल त्यांना बोलू द्या. बागेत आणखी किती जण आहेत याबद्दलही त्यांना चर्चा करू द्या. उदाहरणार्थ - पहिल्या चित्रात किती मुले खेळत आहेत आणि त्यांच्याबरोबर आणखी किती जण आहेत? आजी-आजोबांचा मान राखणे व त्यांच्या संगतीत वेळ घालवण्याचे महत्त्व याबद्दलही मुलांना परस्परांशी चर्चा करून द्या.




## एकूण किती सांगा? गाळलेल्या जागा भरा.?




4 मुले आणि 2 मुले मिळून ____ मुले होतात।

4 + 2 = ☐



3 भोवरे आणि 1 भोवरा मिळून ____ भोवरे होतात।

3 + 1 = ☐



3 मुंग्या आणि 2 मुंग्या मिळून ____ मुंग्या होतात।

3 + 2 = ☐



4 पेन्सिली आणि 3 पेन्सिली मिळून____ पेन्सिल होतात।


4 + 3 = ☐

मुलांना ठोस वस्तू जसे - बाटल्यांची झाकणे, काड्या, दगड देऊन बेरजा करण्यासाठी पुरेशी संधी द्या. मुलांना दोन गटांतील वस्तू एकत्र करून एकूण वस्तूंची संख्या काढणे आणि वस्तूंच्या विद्यमान गटामध्ये अधिक वस्तू मिळवून (वृद्धी) एकूण वस्तूंची संख्या काढणे यांसाठी प्रोत्साहित करा. दोन्ही प्रकारच्या प्रश्नांचा मुलांचा सराव घ्या.।



© NCERT not to be republished

# बेरीज करून रिकाम्या जागी एकूण वस्तूंचे चित्र काढा।



6 चेंडू आणि 2 चेंडू मिळून ____ चेंडू होतात।

$6 + 2 = \square$



$7 + 1 = \square$



## चला मोजून पाहू

अ. तुमच्या आई आणि बाबांना एकूण किती भाऊ आणि बहिणी आहेत??

ब. तुमच्या आणि तुमच्या मित्राच्या कुटुंबात एकूण किती सदस्य आहेत?

क. तुमच्या दोन्ही हात आणि पायांना मिळून किती बोटे आहेत?


ड. तुम्ही तुमच्या बोटांवर एकूण किती अंक मोजू शकता?

मुलांना बेरजेसंबंधी वाक्ये समजून घेण्यासाठी आणि मोठ्याने बोलण्यासाठी प्रोत्साहित करा. उदाहरणार्थ, 4 मुले आणि 2 मुले मिळून 6 मुले होतात. प्रतीके वापरण्यापूर्वी मुलांना 'मिळवणे', 'एकूण' इत्यादी शब्दसंग्रह विकसित करण्यासाठी ठोस सामग्री आणि बोलीभाषेसह सुरूवात करा. 'मिळवणे' हा शब्द बेरीज (+) आणि 'बरोबर' हा शब्द (=) च्या चिन्हासह जोडा।




© NCERT not to be republished


## बोटांची एकूण संख्या मोजा आणि लिहा.।




4 + 3 =




3 + 2 =



5 + 3 =



4 + 0 =




4 + 4 =

© NCERT not to be republished



## चला खेळू या- फासे वापरुन बेरीज करू या!



तुमच्या मित्राबरोबर दोन फासे घेऊन खेळा. दोन्ही फासे एकत्र फेका आणि दोन्ही फास्यांवर एकूण ठिपक्यांची संख्या मोजा. आता तुमच्या मित्राला दोन्ही फासे एकत्र फेकायला सांगा आणि दोन्ही फास्यांवर एकूण ठिपक्यांची संख्या मोजा. कोण जास्त गुण मिळवतात ते शोधा?


## चल करू या

किशोर आणि नित्या सुद्धा हाच खेळ खेळले आणि त्यांनी त्यांचे एकू गुण लिहिले. त्यांच्या गुणतक्त्यावर (✓) चिन्ह लिहून किशोर किती वेळा जिंकला आणि नित्या किती वेळा जिंकली ते शोधा

| | किशोर | नित्या |
|---|---|---|
| अ | | |
| ब. | | |
| क. | | |
| ड. | | |
| इ | | |









# मणी आणि माळा

खाली दिलेल्या अंकांनुसार माळेमधील मणी रंगवा आणि एकूण रंगीत मण्यांची संख्या मोजा।


$3 + 4 =$ ☐




$4 + 2 =$ ☐




$5 + 4 =$ ☐



$2 + 7 =$ ☐



$7 + 3 =$ ☐



मुलांना मण्यांच्या माळांशी खेळायला प्रोत्साहित करा. बेरजेची प्रक्रिया आणि मुले त्यासाठी वापरत असलेल्या पद्धतींवर चर्चा करा।




© NCERT not to be republished

# उड्या मारा आणि बेरीज करा


4 + 2 =





3 + 2 =




5 + 3 =




6 + 3 =




© NCERT not to be republished

# आपल्या पद्धतीने बेरीज करा

अब्दुल आणि रिहाना दोन वेगळ्या पद्धतींनी बेरीज करत आहेत.
त्यांना बेरीज करण्यात मदत करा।




| | |
|---|---|
| 2<br>+ 3<br>___ | 2 + 3 = ___ |
| 5<br>+ 1<br>___ | 5 + 1 = ___ |
| 3<br>+ 3<br>___ | 3 + 3 = ___ |
| 9<br>+ 1<br>___ | 9 + 1 = ___ |


© NCERT not to be republished





## चला करू या

### क. रिकाम्या जागी संख्याजोड लिहा—




कोणार्क सूर्यरथाचे चाक

### ख. बेरीज करा आणि जोड्या

| | | |
|---|---|---|
| 1 + 4 | 5 | 4 + 2 |
| 6 + 3 | 6 | 3 + 4 |
| 5 + 2 | 7 | 3 + 2 |
| 0 + 6 | 9 | 5 + 4 |



## प्रकल्प कार्य

0 ते 9 पर्यंतचे दहा अंकपत्ते घ्या

बाजूला दाखवल्याप्रमाणे पत्ते अशा प्रकारे मांडा की त्यांची बेरीज 9 येईल।

हे करण्याचे अनेक मार्ग असू शकतात. तुम्ही हे किती प्रकारे करू शकता?

☐ + ☐ = 9

☐ + ☐ + ☐ = 9

☐ + ☐ = 9



© NCERT not to be republished

## बेरजेची गोष्ट

अ.घवकडे 4 शंख  आहेत आणि  सरिताकडे 5 शंख  आहेत. दोघांकडे एकूण किती शंख आहेत? ☐

ख. ब. मीनाक्षीकडे 3 गोट्या  आहेत आणि रणजीतकडे 6 गोट्या आहेत. दोघांकडे एकूण किती गोट्या आहेत? ☐

क. एका पोत्यात 3 नारळ  आहेत. दुसऱ्या पोत्यात 4 नारळ आहेत। एकूण किती नारळ आहेत? ☐

## तुमच्या दप्तरात काय आहे ते पाहू या?

अ.माझ्या  दप्तरात _____ पुस्तके आहेत आणि माझ्या मित्राच्या दप्तरात _____ पुस्तके आहेत. आमच्या दोघांच्या दप्तरात __________ पुस्तके आहेत।

ब. माझ्याकडे _____ पेन्सिली आहेत आणि माझ्या मित्राकडे _____ पेन्सिली आहेत. आमच्याकडे एकूण ________ पेन्सिली आहेत।


क.माझ्याकडे _____ वह्या आहेत आणि माझ्या मित्राकडे _____ वह्या आहेत. आमच्याकडे एकूण ________ वह्या आहेतकुल मिलाकर _____ कॉपियाँ हैं।

© NCERT not to be republished



### विचार करून सोडवा

दिलेल्या तक्त्यामध्ये 1, 2 आणि 3 संख्या अशा प्रकारे लिहा की प्रत्येक वेळी बेरीज 6 च येईल।




हा उपक्रम मुलांच्या जोड्यांमध्ये घेता येऊ शकतो. मुले त्यांची पुस्तके आणि पेन्सिली बाहेर काढून मोजून सांगतील की एकूण किती आहेत. मुलांना स्वतः प्रश्न तयार करण्यास आणि सोडवण्यास प्रोत्साहित करा. तसेच मागील पानावर दिलेल्या चक्रावर (कोणार्क, ओडिशा येथील जगातील सर्वात जुन्या सूर्यमंदिराबद्दल) वर्गात चर्चा करा।



# बसमध्ये बसली मुले पाच


बसमध्ये बसली मुले **पाच**
बसल्या बसल्या करती नाच
एक उतरला घरापाशी
हातात मोती, माळा, हार,
बसमध्ये आता मुले **चार**।








बसमध्ये बसली मुले **चार**
झाडांवर त्यांचा जीव फार
एक उतरला झाडापाशी
आमची मुले किती लीन,
बसमध्ये आता मुले **तीन**




बसमध्ये बसली मुले **तीन**
आमची मुले किती लीन,
एक उतरला घरापाशी
घरी पळत गेला कोण,
बसमध्ये आता मुले **दोन**।



© NCERT not to be republished

बसमध्ये बसली मुले **दोन**
बघा दंगा करतंय कोण
एक उतरला घरापाशी
हातात घेऊन बसला केक,
बसमध्ये उरला केवळ **एक**।







बसमध्ये बसला मुलगा **एक**,
हातात त्याच्या होता केक
एक उतरला घरापाशी
आजी होती तिथे उभी,
बसमध्ये आता कोणीच नाही
मज्जा आली ढम्मक ढम,
उद्याला पुन्हा भेटू आपण

## आओ बातचीत करें

अ. बसमध्ये सुरुवातीला किती मुले होती?
ब. पहिल्या थांब्यावर बसमधून किती मुले उतरली?
क. पहिल्या थांब्यानंतर बसमध्ये किती मुले उरली?
ड. दुसऱ्या थांब्यानंतर बसमध्ये किती मुले उरली?
तिसऱ्या, चौथ्या आणि पाचव्या थांब्यांसाठीदेखील याचे उत्तर द्या.."
इ. शेवटी बसमध्ये किती मुले उरली?

## प्रकल्प कार्य




तुमच्या घरी किती लोक आहेत? त्यांतील किती जण शाळेत जातात? किती जण कामासाठी बाहेर जातात? किती जण घरी राहून काम करतात?

© NCERT not to be republished

## चला करू या

# किती उरले?

अ.

6 बेडूक | दोघांनी पाण्यात उडी मारली | उरले ____ बेडूक

6 – 2 = ______




ब.

7 फुगे | ______ उडून गेले | 5 फुगे उरले

7 – 2 = ______

क.

9 केळी | 6 तोडून नेली | उरली ____ केळी

9 – 6 = ______

© NCERT not to be republished

## वजाबाकी करा आणि चित्रेही काढा


ड.

____ कुंड्या ___ कुंडी फुटली उरल्या ____ कुंड्या

3 – ______ = ______


इ.

7 लाडू 4 लाडू खाल्ले राहिले ____ लाडू

7 – 4 = _____


फ.

7 चेंडू ______ चेंडू मुलांनी घेतले उरले ______ चेंडू

7 – ______ = ______

## खालील प्रश्नांची उत्तरे द्या


1. मनीषाकडे  9 केळी  आहेत. तिने 3 खाल्ली. तिच्याकडे किती केळी शिल्लक आहेत? [ ]

2. एका झाडावर 8 फुलपाखरे  आहेत. 5 फुलपाखरे उडून गेली. आता किती फुलपाखरे राहिली? [ ]




© NCERT not to be republished

## चला करू या!

दहा ठिपक्यांचा एक पत्ता बनवा आणि तुमच्या मित्रांपासून काही ठिपके लपवा. त्यांना विचारा की किती ठिपके लपलेले आहेत।



किती ठिपके लपलेले आहेत आणि किती ठिपके दिसत आहेत?


| एकूण ठिपके 10 | लपलेले ठिपके | दृश्यमान ठिपके |
|---|---|---|
|  | 0 | 10 |
|  | | |
|  | | |
|  | | |

## प्रकल्प कार्य


मुलांना 8 ठिपके असलेली एक चौकट बनवायला सांगा. आता आपल्या भाऊ/बहीण/मित्रापासून काही ठिपके लपवा आणि किती ठिपके लपलेले आहेत आणि किती दृश्यमान आहेत हे त्यांना विचारा. मुलांचे लक्ष ठिपक्यांच्या पत्त्याकडे वेधून त्यात काही नमुना दिसतो आहे का हे विचारा. हा उपक्रम इतर संख्यांसाठीदेखील घ्या. ठिपके न लपवता हे करणे शक्य आहे का?

© NCERT not to be republished

## संख्यापट्टीवर मागे उडी मारून संख्या सांगा।





अ. 9 वरून 3 पावले मागे उडी मारा।




9 – 3 = 6

ब. 7 वरून 4 पावले मागे उडी मारा।




7 – 4 = ☐

## तुमच्या पद्धतीने वजाबाकी करा

अ. 8 – 2 = ☐

घ. 6 – 3 = ☐

ब. 7 – 3 = ☐

ङ. 5 – 1 = ☐

. 9 – 5 = ☐

च. 4 – 2 = ☐

© NCERT not to be republished